Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-11 | Dec-2014
Available online at www.lbp.world

# ययाति कांदबरी :
# 'साहित्य अकादमी' चा मराठी साहित्यातील पहिला पुरस्कार

प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)

**प्रास्ताविक**

'साहित्य अकादमी' चा मराठी साहित्यातील पहिला पुरस्कार वि. स. खांडेकरांच्या 'ययाति' या कांदबरीला मिळलेला आहे. बदलत्या काळानुरुप विविध साहित्यीकांच्या लेखनाला हा पुरस्कार मिळत गेला आहे. अशा पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्याचा विविधांगी अभ्यास प्रस्तुत प्रकरणात या साहित्याकृतीचे कालक्रमानुसार वर्गीकरण करुन ती कांदबरी वैचारिक अंगाने तसेच भाषाशैलीने, सांस्कृतिक चित्रणाने, व्यक्तिरेखाटनाने, निवेदन पद्धतीने, प्रसंगनिर्मितीने विवेचन करुन, त्या कथा-कादंबरीला मिळलेला पुरस्कार कशा पद्धतीने योग्य आहे, याचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात स्पष्ट करता येईल.

पौराणिक जीवनविषयाला केंद्रस्थानी ठेवून वि.स. खांडेकरांनी 'ययाति' च्या जीवनाची करुण कहाणी या कादंबरीतून स्पष्ट केलेली आहे. साहित्याबद्दल आणि माणसाबद्दल खांडेकरांना उत्तम पारख होती. पौराणिक जीवनावर आधारित साहित्याचे वाचन करीत असताना, खांडेकरांच्या शब्दसामर्थ्याने अक्षरशः पौराणिक जीवनाला जिवंत केले आहे. आपल्या प्रतिभेला योग्य असा न्याय देताना खांडेकरांनी योग्य अशा कथानकाची निवड करुन आत्मविष्कार साधला आहे.

जीवनाचे चिंतन आणि मनन करणारे खांडेकर 'ययाति' कांदबरीच्या रुपाने जीवनातील सत्याचे आकलनही करुन देतात. खांडेकरांनी 'ययाति' कांदबरीतून पुराणकथेच्या आधाराने एक सर्वोत्तम ललितकृती कशी तयार करता येते, याचा आदर्श घालून दिला आहे. "ही कांदबरी ययातिची कामकथा आहे. देवयानीची संसारकथा आहे. शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्तीगाथा आहे. हे लक्षात येऊन वाचकांनी ती वाचावी अशी अपेक्षा स्वतः खांडेकरांनीच प्रकटपणे व्यक्त केली आहे." वि.स. खांडेकरांनी 'ययाति' या पौराणिक कांदबरीनिर्मीतीची भूमिका स्पष्ट केलेली आहे. 'ययाति' या कांदबरीचे वर्गीकरण त्यांच्या मनामध्ये स्पष्ट झाल्याचे दिसून येते.

'ययाति' च्या स्मरणगाथेतून लिहिलेली ही कांदबरी वेगवेगळ्या घटकांनी परिपूर्ण अशीच आहे. कांदबरीतून साकारणारी वैचारिकता, भाषाशैली, सांस्कृतिकता, व्यक्तिरेखाटन, निवेदनपद्धती, प्रसंगनिर्मिती, वातावरणनिर्मिती या सर्वच पातळ्यांवर 'ययाति' कांदबरी आपले वेगळेपण सिद्ध करते आणि म्हणूनच ती साहित्य अकादमीच्या पुरस्कारास पात्र ठरते. असेच म्हणता येते. 'ययाति' कांदबरीतून साकारणाऱ्या या वैविध्यपूर्ण घटकांचे विस्तृत विवेचन करुन तिच्या योग्यतेची ओळख करुन देता येते.

## १. 'ययाति'मधील भाषाशैली :

'भाषा' ही ललित साहित्याचा प्रधान घटक आहे. भाषेद्वारेच लेखक अभिव्यक्त होत असतो. भाषा ही लेखकाच्या आत्माविष्काराला परिणामकारक बनविते, तर त्यातील पात्रांना, घटना-प्रसंगांना तेवढ्याच कलात्मकतेने सामोरे आणते. भाषा ही कादंबरीच्या आशयाची उंची वाढविणारी असल्याने ती आशयाला अनुरुप अशीच असावी लागते. तशीच वैशिष्ट्यपुर्ण भाषा 'ययाति' या कादंबरीतून साकारल्याने वि. स. खांडेकरांच्या प्रतिभासंपन्नतेची ओळख मराठी वाचक, रसिकांना झालेली आहे. खांडेकरांनी कांदबरीतून उभारलेल्या पौराणिक जीवन विषयाला त्यांची भाषा कलात्मकतेने साकार करुन कांदबरीचे वाङ्मयीन सौंदर्य वाढविण्यास परिपुर्ण ठरते.

'ययाति' कादंबरीतून साकारलेली भाषा त्या पात्रांच्या मनोविश्वाला अतिशय प्रभाविपणे रेखाटताना दिसते. त्या भाषाशैलीची ओळख करुन देणारी पुढील काही वाक्ये पाहुन कादंबरीच्या भाषाशैली या घटकाला मांडता येईल.

"आम्ही महालात नव्हतो. आम्ही हस्तिनापूरात नव्हतो. आम्ही पृथ्वीवर नव्हतो. अनंत आकाशात तारामंडलाच्याही पलीकडे दु:ख, रोग, मृत्यू या शब्दीचे ध्वनीसद्धा जेथे ऐकू येत नाहीत, अशा स्थळी आम्ही पोहचलो होतो. ते अगदी वेगळे जग होते. जितके सुंदर तितके धूसर! जितके मोहक तितकेच दाहक! ते केवळ आमचे दोघांचे जग होते. ती मधुर मूर्च्छा होती. ते विलक्षण वेड होते. ती सुंदर समाधी होती?

त्या धुंदीतून मी जागा झालो, पक्ष्यांच्या किलबिलाटाने मी डोळे उघडून समोरच्या खिडकीतून पाहिले. पुर्वेच्या महाद्वारातून सुर्याचा रथ वेगाने बाहेर पडत होता. त्याच्या चाकाने उडविलेली सोनेरी धूळ किती मोहक दिसत होती. या ययातिच्या आत्मनिवेदनाची भाषा त्यांच्या मनोभावाचे खरे रुप न दाखवता अलंकारीकताच अधिकाधिक दिसून येते. वेदसुद्धा हृदयभावना व्यक्त करताना अपुरे पडतात! आचार्यांचे आपल्याला अनेक आर्शिवाद नहुष महारांजाना लवकर आराम पडो, अशी भगवान उमा-शंकरापाशी प्रार्थना.

"अरे, हो एक गोष्ट लिहायची राहिलीचं. आपली ती चिमुरडी एक फुल दोघांना कसं द्यावं म्हणून गोंधळलेली गोड मुलगी मी आश्रम सोडून जाणार, म्हणून ती ओक्शीबोक्शी रडत आहे. तिच्या वेलीवर फुलेच-फुलं फुललेली आहेत. त्याचे कौतुक आता कोण करणार म्हणून ती काळजीत पडली आहे. मी तिला सांगितले आहे की, युवराज पुन्हा लवकरच तुझ्यासाठी आश्रमात येतील. नुसती तुझी फुलं पहायला नाही तर त्यांचा वास घ्यायलासुध्दा!" खांडेकरांनी कोणत्याही पात्राची मनोअवस्था वर्णन कताना निसर्गातील प्रतिमांचा वापर केलेला आहे. म्हणून त्यांची भाषा प्रतिमांची भाषा वाटते.

"मनात जळत मी स्तब्ध राहिलो. पण माझी स्तब्धता ही आईला पापाची कबुली वाटली असावी! करवतीने एखादे लाकूड कापतात, तसे माझे मन चिरीत ती खवचट, उपरोधपूर्ण स्वराने म्हणाली,'ययाति' या कादंबरीची भाषा, त्यातून आलेले निवेदन हे वाचकांच्या मनाचा ठाव घेत नाही तर खांडेकरकालीन शब्द आणि भाषा यांचे रुप कळून येते. "मृत्यूच्या दारात राजासद्धा भिकारी होतो, मी तिला काही काही देऊ शकत नव्हतो. नकळत माझी मान खाली गेली. अलकेच्याओठांवर माझे ओठ टेकले." अलका या व्यक्ती जीवनाचा शेवट करताना खांडेकरांनी काव्यात्म भाषा वापरलेली आहे. त्या प्रसंगानुसार खांडेकरांनी योजीलेली भाषा-प्रसंगाचे भान न ठेवता काव्यात्मरुपात गेलेली आहे. आज अरुणोदय झाला, तो लहानपणाप्रमाणेच महालाच्या खिडकीतून माझ्यावर गुलाल उधळीत. मी शय्येवरुन डोळे भरुन तो पाहत होतो. मध्येच मनातल्या मनात लाजले. तो अरुण लग्नातल्या पवित्र होता. सारखा वाटला मला. मग रात्री झोपायला जाताना आईने केलेल्या गोष्टीची आठवण झाली. ती मला कुरवाळीत म्हणाली होती. व्यक्तीमध्ये भावदर्शन घडविताना खांडेकर मानसिक स्थितीचा विचार न करता त्या पात्राची मनोभावना पूर्ण अलंकारिकतेतून वर्णन करतात म्हणून व्यक्तीचे भावदर्शन उठावदार होत नाही.

खांडेकरांनी 'ययाति' मध्ये ज्या भाषेची योजना केलेली आहे, ती पूर्ण अलंकार प्रचूर आहे. अलंकाराच्या अतिरेकी हव्यासापोटी पात्राचे मनोभाव खऱ्या रुपात जिवंतपणाने उभे राहत नाहीत. म्हणजेच अलंकाराच्या अतिरेकी सोसापोटी त्यांनी कथानक आणि व्यक्तीदर्शन याना निव्वळ काव्यात्मक पातळीतून स्पष्ट केल्याचे दिसून येते.

१. खांडेकरांची भाषा अलंकाराने नटलेली आहे.
२. खांडेकरांच्या भाषेत स्थलवर्णन/व्यक्ती मनोदर्शन घडविताना आशय आणि अभिव्यक्तीचे भान त्यांनी राखलेले नाही.
३. निसर्ग वर्णनातून प्रतिमाची योजना करणे हा खांडेकरी मनोवृत्तीचा एक भाग आहे.
४. खांडेकरांची भाषाअलंकारामुळे वाचकांच्या मनाला भुरळ घालते
५. अलंकारिक भाषेमुळे खऱ्या जीवन दर्शनाला खांडेकर समोरे जावू शकले नाहीत.
६. भाषेत अलंकार यावेत पण अलंकारिक भाषेमुळे व्यक्ति आणि कथानक यांची जुळणी झाली पाहिजे. तसे न करता खांडेकर भाषेच्या अलंकारिकतेत वाहत गेलेले दिसतात.
७. खांडेकरांच्या कांदबरीचे पूर्ण निवेदन प्रमाण भाषेतून केलेले आहे.
८. कोणत्याही ललित साहित्य कलाकृतीचा भाषा हा महत्वाचा घटक आहे. ही भाषा त्या त्या प्रसंगाची आणि व्यक्तीमनाची सहजपणाने उकल करणारी असली पाहिजे. पण खांडेकर अलंकाराच्या हौशेपोटी इतर सर्वच बाबी विसरुन गेल्याचे दिसतात.
९. मराठीतील खांडेकरांवर लिहिलेल्या सर्वच समिक्षकांनी त्यांची भाषा निवेदनाशी कुठेही एकरुप झालेली नाही. असा आक्षेप नोंदविलेला आहे.

खांडेकर हे मराठीतले वाचकप्रिय लेखक आहेत, पण रसिक प्रेरित लेखक म्हणून त्याची दखल घेताना विचार करावा लागतो. मराठीतील सुप्रसिद्ध समिक्षक वा. ल. कुलकर्णी यांनी त्यांच्या 'साहित्य स्वरुप आणि समिक्षा' या ग्रंथात ललित साहित्याच्या स्वरुपाची चर्चा करताना 'आशय अभिव्यक्तीचे अभिनत्व' हा एक प्रधान घटक मानलेला आहे. तो निवेदन आणि भाषा या दृष्टीनेच. परंतु खांडेकर

निवेदनाच्या भाषेत विविध अलंकार योजीकाची हौस करतात. खऱ्या कथा आशयाला ते भिडू शकले नाहीत. हे त्यांच्या लेखनातील दोष मीच नव्हे तर कोणत्याही जाणकार समिक्षकांने सांगितलेले आहे. वा.ल. कुलकर्णी यांनी वि. स. खांडेकरांच्या भाषाशैलीतील गुणदोषाचे विवेचन अत्यंत सुचकपणे आणि समर्थपणे स्पष्ट केलेले आहेत.

## २. 'ययाति' कांदबरीतील निवेदन पद्धती :

कादंबरी या साहित्यामध्ये अत्यंत महत्वाचा घटक म्हणुन निवेदनपद्धती महत्वाची आहे. कादंबरीच्या निवेदनावरच आविष्काराचे स्वरुप अवलंबून असते. कथानकाची परिणामकारकता कथनपद्धतीवर अवलंबून असल्यामूळे योग्य पद्धतीची निवड व तिचा उपयोग लेखकास कलात्मकतेने आणि कौशल्याने करावा लागतो. 'लेखक आपली कथा ज्या प्रकारे सांगतो. त्यास कथानकाची निवेदनपद्धती किंवा कथनपद्धती म्हणतात.' कथानकातील निवेनदापद्धतीचे स्वरुप आणि महत्व स्पष्ट होते. 'ययाति ' कादंबरीत निवेदनाची बहुअंगी पद्धत न वापरता ते निवेदन पात्रमुखी स्वरुपात केल्याचे दिसून येते. खांडेकरांनी 'ययाति' कांदबरीतून योग्य पद्धतीच्या निवेदनाचा वापर केल्याने त्यांच्या कथानकाची परिणामकारकता यथोच्छित साधली आहे. वि. स. खांडेकर हे मराठी वाचकांचे आवडते लेखक. कथा, कादंबरी, ललित, गद्य, रुपककथा या विविध वाङ्मय प्रकारांतून त्यांनी विपूल लेखन केलेले आहे. खांडेकरांच्या निवेदन व लेखनशैलीत उभ्या मराठी रसिकाला भुरळ घातलेली आहे. त्यांची कथानके आणि निवेदनशैली यामुळे सर्वत्र त्यांच्या साहित्याचे स्वरुप, वर्गीकरण आणि महत्व स्पष्ट झाल्याचे दिसून येते. ययातिचे निवेदन, बहुअंशी 'ययाति' या मुख्य व्यक्तिरेखेच्या तोंडूनच केलेले आहे. यास पात्रमुखी किंवा आत्मनिवेदन म्हणता येईल. कथा कशी मांडली, रचनातंत्र कसे साधले याबरोबर, त्या कथानकाला आकार देताना ते कसे सांगितले यावर कोणत्याही निवेदनात्मक ललित साहित्याचे यश अवलंबून असते. खांडेकरांची निवेदनशैली वाचकांना सहज आकर्षित करते. त्यांच्या कथन पद्धतीला वाचक सहज स्वीकारतात, हा एक महत्वाचा भाग आहे. समीक्षेच्या दृष्टीने विचार करता त्यांच्या लेखनात, निवेदनात ज्या उणिवा आहेत त्याचेही विवेचन करणे मला अत्यंत महत्वाचे वाटते.

"ययाति' ही कांदबरी मुळात 'ययाति' राजा आणि त्याची कामांध मनोवृत्ती यातून गुंफलेली आहे. यातील प्रमुख पात्रे म्हणजे ययाति, देवयानी, शर्मिष्ठा ही आहेत. या व्यक्तिरेखांचे आत्मनिवेदन या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. 'ययाति' निवेदन करतो पण देवयानी आणि शर्मिष्ठा ही पात्रंही काही भाग निवेदन करतात. निवेदन आत्मनिवेदन ही खांडेकरांची एक प्रबल लेखनप्रवृत्ती आहे आणि त्याचे काही फायदे या कांदबरीला मिळालेले आहेत. काही बंधने आली आहेत. तोटेही झाले आहेत."[४] चंद्रकांत बांदिवडेकर यांनी वि.स. खांडेकरांच्या निवदन पद्धती विवेचन वाङ्मयीन मूल्यांच्या आणि वाङ्मयीन वर्गीकरणाच्या अनुषंगाने अभिव्यक्त केल्याचे दिसून येते. तसेच बांदेवडेकरांच्या खांडेकरी निवेदन शैलीसंदर्भात ते म्हणतात,"पौराणिक पात्रांच्या आत्मनिवेदनाच्य रुपाने सांगितलेल्या कथेत खांडेकरांना काही गोष्टी टाळणं शक्य झालेले आहे."[५]

## ३. निवेदन :

वि.स.खांडेकरांनी 'ययाति' या पौराणिक कांदबरीतील व्यक्तीमत्वामधून त्यांनी ययाति, शर्मिष्ठा, देवयानी यांच्याकडून पात्रात्मक निवेदन केलेले आहे. म्हणजेच आत्मनिवेदन केलेले आहे. कांदबरीची सुरुवात मूळातंच ययातिच्या आत्मनिवेदनाने झालेली आहे.

- **आत्मनिवेदन :**

"माझी कहाणी मी का सांगत आहे ? माझे मलाच नीट कळत नाही.
मी राजा आहे, म्हणून का मी हे सारे सांगत आहे ? मी राजा आहे ? छे ! होतो.

राजे-राण्यांच्या गोष्टी लोक मोठ्या आवडीने ऐकतात. त्यांच्या प्रेमकथांत तर जगाला फार-फार गोडी वाटते. मोठमोठे कवी त्या कथांवर काव्ये रचतात.

माझी कहाणी हीसुद्धा एक प्रेमकथा- छे! ती कसली कथा आहे, कुणाला ठाऊक! एखाद्या कवीचे मन वेधून घेण्यासारखे तिच्यात काही नाही, हे मला कळते, पण केवळ एखाद्या राजाची कथा म्हणून काही ती सांगायला मी सिद्ध झालेलो नाही. या कहाणीच्या मुळाशी कोणत्याही प्रकारचा अभिमान नाही, अहंकार नाही, प्रदर्शन नाही, शेल्याची लक्तरे आहेत ही, त्यात प्रदर्शन करण्यासारखे काय आहे? राजाच्या पोटी मी जन्माला आलो, म्हणून राजा झालो, राजा म्हणून जगलो, यात माझा गुणदोष नाही. हस्तिनापुरच्या नहुष महाराजांच्या पोटी परमेश्वराने मला जन्म दिला. पित्याच्या मागून सरळ सिंहासनवर बसलो मी. त्यात कसले आहे मोठेपणा? राजवाड्याच्या शिखरावर बसलेल्या कावळ्याकडेसुद्धा लोक कौतुकाने पहातात. राजपुत्र न होता मी ऋषीकुमार झालो असतो, तर माझे जीवन कसे झाले असतें? शरद ऋतूतल्या नृत्यमग्न चांदण्या रात्रीसारखे, की शिशिरातल्या अंधाऱ्या राणीसारखे? कुणी सांगावे?

आश्रमात जन्माला येऊन मी अधिक सुखी झालो असतो? छे? या प्रश्नाचे उत्तर शोधशोधूनही मला मिळत नाही. एक गोष्ट मात्र राहून राहून मनात येते. कदाचित माझी जीवणकहाणी अगदी साधी झाली असती. एखाद्या वल्कलासारखी. अनेक रंगानी आणि विविध धाग्यांनी नटलेल्या राजवस्त्रांचे रुप तिला कधीच आले नसते, पण त्या वस्त्राचे सारेच रंग काही मला सुखद वाटत नाहीत."[६] वि.स.खांडेकरांनी 'ययाति' आत्मनिवेदनातून या पात्राची जीवनकथा, कर्मकथा त्याचे कौटुंबिक व राजकीय जीवन प्रमाण अभिव्यक्त केलेले आहेत.

अशाप्रकारे 'ययाति' माझी कहाणी मी सांगत आहे? माझे मलाच नीट कळत नाही! अशा आत्मनिवेदनाने 'ययाति' या कादंबरीची सुरुवात खांडेकरांनी केलेली आहे. 'ययाति' स्वतः त्या जीवनाची कहाणी स्वतःच या कादंबरीतून सांगतो. म्हणजेच त्याने केलेल्या त्याच्या जीवनाचे एकप्रकारे आत्मनिवेदनचं आहे. जिथे जिथे 'ययाति' च्या मनातील भावना, खांडेकरांनी प्रकट केलेल्या आहेत. त्यावेळी ययाति, शर्मिष्ठा, देवयानी या पात्रांना मुक्तपणाने त्यांची भाववस्था, मनोअवस्था सांगण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. हा एक या निवेदनाचा एक महत्वाचा घटक वि. स. खांडेकरांच्या आत्मनिवेदनातून स्पष्ट झाल्याचे दिसून येते.

- **पात्रमुखी निवेदन :**

'ययाति' या कांदबरीचे खांडेकरांनी केलेले निवेदन बहुअंशी पात्रमुखी आहे. ययाति, शर्मिष्ठा, कच, देवयानी या व्यक्तीरेखांच्या तोंडून त्यांच्या मनातील भावभावना खांडेकरांनी कथन केलेल्या आहेत म्हणून हे निवेदन पात्रमुखी ठरते. हा या निवेदन-कौशल्याचा वेगळेपणा आहे. अशा निवेदन पद्धतीतून त्या त्या पात्राला त्याच्या स्वअस्तेत्वाने मनोभावाने जगू देण्याचे स्वातंत्र्य खांडेकरांनी दिलेले आहे. यामुळेच 'ययाति'तील व्यक्ती त्यांच्या नैर्सगिक स्वभावधर्मानुसार जगत असल्याची खरी जाणीव होते. देवयानी ययातिची पत्नी आहे. तिच्या मनातील सौंदर्यभावना तिच्याच आत्मनिवेदनाने वर्णन केलेला आहे.

"म्हणजे, पृथ्वीतलावर इतकी सुंदर स्त्री"

माझ्या सौंदर्याने महाराजांचे मन जिंकले होते. त्या सौंदर्याच्या पारड्यात आणखी वजन टाकायला हवे होते. किंचीत मान वर करुन महाराजांकडे एक कटाक्ष टाकीन आणि पुन्हा खाली पाहत मी म्हणाले,

"मी शुक्राचार्यांची मुलगी देवयानी."
"शुक्राचार्यांची, दैत्यगुरु शुक्राचार्यांची मुलगी"

वि. स. खांडेकरांनी या अशा पद्धतीने पात्रांच्या तोंडून केलेले आत्मनिवेदन यामुळे 'ययाति' कादंबरीतील व्यक्तीरेखा पौराणिक असल्या तरी सजीव आणि जीवंत वाटतात. मानवी मूल्यांची जाणीव व्यक्त होताना दिसून येतात.

- **पत्रात्मक निवेदन :**

'ययाति' च्या निवेदनाचा विचार करताना आत्मनिवेदनाबरोबर पत्रात्मक निवेदनही केलेले आहे. कादंबरीचा नायक 'ययाति' चे वडील 'नहुष' होते. त्यांच्या कुलाचे कुलगुरु अंगीरस ऋषी होते. त्यांनी ययातिला पत्र लिहून दोन शिष्यांमार्फत पाठवून दिले. उदा. खांडेकरांनी पत्रात्मक निवेदन कसे केले आहे त्या पत्राचे उदाहरण पुढीलप्रमाणे दिलेले आहे-

"नहुषमहाराजांच्या देहावसनानंतर काही काळानं मी तुला हे पत्र पाठवित आहे.

मध्यंतरी मी आश्रमातच नव्हतो, म्हणून हा विलंब होत आहे. तुझ्या पाठोपाठ कच संजीवनी विद्या संपादन करण्यासाठी वृषपर्ण्याच्या राज्यात गेला. आपला शांतीयज्ञ निर्विघ्न संपला होता. डोळ्यांसमोर अमंगल घडत असताना हात जोडून स्वस्थ बसण्यात पुरुषार्थ नाही, म्हणून शिवतिर्थावर जाऊन तिथं एकांतात पुरश्चरणं करण्याचा संकल्प मी केला आणि आश्रम सोडला. तो संकल्प पुरा करुन आश्रमाकडे परत येत असताना मार्गात नहुषमहाराजांच्या निधनाची वार्ता कळली. आज इथं आल्यावर तुला चार शब्द लिहायला बसलो.

ययाति, मृत्यू हा जीवनमात्राला जितका अप्रिय तितकाचं अपरिहार्य आहे. तो सृष्टीचक्राच्या जन्माइतकाच नाट्यपूर्ण आणि रहस्यमय भाग आहे. वसंत ऋतूत वृक्षांवर हळूच डोकावणारी तांबूल, कोमल पालवी जशी आदिशक्तीची लीला आहे, तशी शिशीरात गळून पडणारी दीर्घ पिवळी पर्ण ही तिचीच क्रिडा आहे. जीवन हे द्वंदात्मक व्यक्त स्वरुप आहे. याचाच अर्थ आडव्या-उभ्या धाग्यांनीच आदिशक्ती विश्वाच्या विलासाची आणि विकासाची एकत्र विणीत असते."

वरील निवेदनातून वि.स. खांडेकरांनी पत्रात्मक निवेदन करताना अंगीरस ऋषीने पत्र लिहिले त्यातून नहुष राजाच्या निधनानंतर नहुषाच्या पराक्रमाची आठवण ययातिला पत्रातून करुन दिली जाते. मृत्यू हा कोणत्याही जीवमात्राला अप्रिय असतो, पण तो अपरिहार्यही आहे. जीवनाचे रहस्य ययातिला आणि अंगीरस ऋषींनी कुलगुरु या नात्याने पत्र पाठवून जे सांगितले ती खांडेकरांच्या निवेदनशैलीचा पत्ररुप एक भाग म्हणून त्याला अत्यंत महत्वाचा आहे.

वि. स. खांडेकरी निवेदन मोठे मोहक आहे. भाषेच्या अंलकारिक हव्यासापोटी 'ययाति' कादंबरीमध्ये केलेले निवेदनाचे कथाभाग बाजूला सारून बांडगुलाप्रमाणे भाषा व निवेदनाकडेच वाचक रसिकांचे लक्ष त्यांनी खेचून घेण्याचा प्रयत्न केला. हा त्यांच्यावरील आक्षेप मराठीतल्या समीक्षकांने नोंदवलेला आहे. निवेदन व भाषाकौशल्याची पूर्ण उणीव आहे. तरीपण वाचकाच्या मनाला भुरळ पाडणारे, आकर्षित करणारे सुंदर निवेदन हा खांडेकरांच्या कथनकौशल्याचा एक महत्वाचा विशेष आहे हे नाकारता येत नाही.

**४. 'ययाति' कांदबरीतील व्यक्तिचित्रण :**

'व्यक्तिचित्रण' हा कादंबरीचा प्राणभुत घटक आहे. पात्रांच्या विशिष्ट स्वभावामूळे कथानकाला विशिष्ट स्वरुप प्राप्त होत असते. व्यक्तिशिवाय कथा आकारास येऊच शकत नाही. त्यामुळे पात्रयोजना या घटकाकडे लेखकाला विशेषच लक्ष द्यावे लागते. निसर्ग आणि समाज यांच्याशी येणाऱ्या संबंधातून, त्या पात्रांचे व्यक्तित्व साकारत असते. मानवी स्वभाव आणि मानवी वर्तन हा नेहमीच वाङ्मयाचा विषय मानला गेला आहे. समाजात चांगला आणि वाईट या दोन्ही प्रवृत्तींच्या व्यक्तिचे दर्शन घडते. अशा स्वभावृत्तींची व्यक्तीचित्रण कादंबरीतून पहावयास मिळतात. कांदबरीतून साकारणारे व्यक्तिचित्रण म्हणजे काय? हे स्कॉट मेरेडिथ यांनी पुढील प्रमाणे सांगितले आहे. 'व्यक्तिदर्शन म्हणजे तुमच्या कथेतील पात्रांना त्यांच्या स्वभावावर प्रकाश टाकुन एकमेकांपासून वेगळे दाखविण्याची पद्धती होय.' स्कॉट मेरेडिथ यांनी कांदबरीतील व्यक्तीचित्रणाचे महत्व त्यांचा वेगळेपणा, त्यांची स्वभाव वैशिष्टे, कथानकाच्या कलात्मक वर्गीकरणाच्या अनुषंगाने स्पष्ट केल्याचे दिसून येते. पात्रांच्या वेगळेपणावर भर देत व्यक्तिचित्रण म्हणजे काय हे स्कॉट मेरेडिथ सांगतात. वि.स.खांडेकरांनी त्यांच्या ययाति कांदबरीत अशी वेगवेगळया स्वभाव वैशिष्टयांची मोठी पात्रसृष्टी उभी केली आहे. खांडेकरांच्या या पात्रसृष्टीचा विचार पुढील प्रमाणे करता येईल.

- **ययाति :**

वि.स. खांडेकरांनी 'ययाति' या कांदबरीमध्ये 'ययाति' ही मुख्य व्यक्तीरेखा आहे. भोगवादी प्रवृत्तीच्या पुराणकाळातील, कुरुवंशातील, नहुष राज्याच्या पुत्राच्या जीवनाची नव्हे त्याच्या मानसिक व शारीरिक वासनेची दर्शन घडविणारी कादंबरी आहे. या कादंबरीचा मुख्य नायक 'ययाति' हाच आहे. ही एक पौराणिक व्यक्तीरेखा आहे. 'ययातिअच्या मनातील भावअवस्थेचे, कामप्रवृत्तीचे दर्शन घडविणे हाच एक उद्देश खांडेकरांच्या 'ययाति' या कांदबरीचा दिसून येतो. राजा असूनही राजपद विसरुन पूर्ण कामवासनेत वाहवत जातो. याची कहाणी म्हणजे 'ययाति' चे जीवनदर्शन मुख्यतः 'ययाति' च्या स्मरणगाथेतून खांडेकरांनी ही कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. ही स्मरणगाथा 'ययाति' थोडयाश्र्या तटस्थपणे पुढे ठेवतो आहे. तिच्यात कथेचा क्रम आहे. तो क्रमशः जीवनाचीही क्रमित कथा आहे. ही केवळ आत्माविष्काराच्या प्रबळ ओढीने, स्मृतींच्या तळमळीने, अवस्थीत आवेगानं, कथेतील घटकांच्या कार्यकारणभावांची तमा न बाळगता, अंतर्मनाच्या ढवळून टाकणाऱ्या स्मृतींनी, सवेंदनात्मक आघातांनी किंवा जाणिवेतील गूढ, रहस्यमय मानसिक हालचालींनी घेतलेल्या अतर्क्य रुपानी अनावर केल्यामूळे बांध तोडून बाहेर आलेली जीवनगाथा नाही. एका परिपक्व मनाच्या अवस्थेत तटस्थ्पणानं आपल्या जीवनाचा वेढा घेत सांगितलेली कथा आहे." वरील मतातून देवयानी या कांदबरीचे स्वरुप, व्यक्तिचित्रणातून त्यांची भावावस्था वैचारिक भूमिकेतून स्पष्ट केल्याचे दिसून येते.

'ययाति' हा पुराणपुरुष आहे. पण ह्या पुराणपुरुषाचा या कादंबरीतील आशय वर्तमानकालीन आहे. म्हणून 'ययाति' हा आधुनिक माणसाच्या नव्या आकांक्षांचे प्रतिनिधीत्व करणारे आहे. त्यामुळे त्याची जीवनकथा सर्वकाळच्या, सर्व देशांच्या, सर्व संवेदनाक्षम जीवाच्या जीवनाची, त्याच्या अनंत यातनांची करुण, भव्यगाथा ठरते. जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून आपल्यासारख्यांची सुटका, मुक्ती कशी होईल याची जर 'ययाति'ला ओढ असती तर, भगवान बुद्धांप्रमाणे जन्म, मृत्यू, जर्रा, व्याधी यांच्या दृष्ट चक्रातून मानवजात कशी सुटेल या विचारचिंतनाने 'ययाति' जर व्याकुळ झाला असता तर प्रश्न वेगळा होता. निदान त्याला जर नचिकेताप्रमाणे शाश्वत सुख व समाधान हवे असते तर प्रश्न निराळा होता. 'ययाति'ला वरीलपैकी काहीच नको आहे. त्याच्या अपेक्षा तशा मर्यादित आहेत. या अपेक्षांची प्राप्ती

करुन घेण्यासाठी, कोणत्याही परिस्थितीत आपले माणूसपण विसरण्याची त्याची तयारी नाही. हे माणूसपण सोडणे जर त्याला जमले असते तर त्याची शोकांतिक होऊच शकली नसती. माणूस म्हणून जगू इच्छिणाऱ्या आणि रातंदिन आपले माणूसपण सांभाळण्याऱ्या 'ययाति' च्या अपेक्षाभंगाची, त्याच्या भ्रमनिरासाची, पशू बनण्याचा कथेत प्रयत्न करुनही पशू न होऊ शकणाऱ्या मानवाची 'ययाति' ही एक करुण जीवनागाथा आहे. वि.स. खांडेकरांनी 'ययाति' च्या विविध जीवनपैलूंचे विवेचन या कांदबरीतून स्पष्ट केल्याचे दिसून येते.

- **दुबळा ययाति :**

वि. स. खांडेकरांनी 'ययाति' या कांदबरीतून राजपदावर असलेले 'ययाति' दुबळ्या मनोवृत्तीने जीवन कसे जगतात, हे वास्तवपणे या कांदबरीतून चित्रीत केलेले आहे. दुबळ्या अशा ययातिच्या जीवनाला त्याच्या पित्याच्या जीवनाचा संदर्भ आहे. त्याला ययातिचा इलाज नाही. ययातिला 'आपण वीर व्हावे' अशी अधूनमधून लहर येते. या लहरीच्या तत्क्षणी तो आहारी जातोही, पण राजकारणाची त्याला आवड नाही. अश्वमेघाचा घोडा होऊन तो निघतोही, पण त्याला कुठे लढावेच लागत नाही. त्याच्या पित्याच्या पराक्रमाचा दरारा एवढा जबरदस्त की, ययातिला पराक्रम गाजवायलासद्धा कुणीच शत्रू मिळत नाही. लढायची हौस जेव्हा त्याच्या मनात एखादे वेळी धुमाकूळ घालते तेव्हा त्याला लढण्याची संधी मिळत नाही. नहुष सम्राटानंतर तो राजा झाला. राजा झाल्यावर त्याला असे फार वाटते की, दस्युंनी उठाव करावा. आपण त्यांच्याशी लढावे व त्यांचा पराभव करावा. पण त्याला हवी असलेली ही घटनाही घडत नाही. कुणीच उठाव करीत नाही. त्यामूळे ययातिला लढण्याची, पराक्रम गाजविण्याची वेळच हवी तेव्हा मिळत नाही. आणि तरीही त्याला हे असे वाटणे हा त्याचा स्थायीभाव नाही. एखादं दुसऱ्या क्षणी त्याच्या अंतरंगाचा ताबा घेणाऱ्या क्षणभावना दुसऱ्या क्षणाला नष्ट होतात. अशी मधून मधून उसळणारी लढायची हौस जर सोडली तर ययातिला राजकारणात रस नाही."

- **भोगवादी 'ययाति' :**

वि.स. खांडेकरांनी नहूषाच्या मुलगा असलेल्या 'ययाति' ची भोगासक्त इच्छा या कादंबरीतून स्पष्ट केलेली आहे. त्याच्या जीवनात शुक्राचार्यांची कन्या देवयानी पत्नी म्हणून येते. ती दानवाने दिलेल्या शाप आणि योगायोगानेच तिच्यात ययातिचे खरे मन रमत नाही. त्याची प्रेमिका शर्मिष्ठा आणि मुकूलेकवरही त्याचा जीव असतो. खरे प्रेम ययातिने कधी केलंच नाही. कामभावनेच्या आहारी गेल्याचे त्याचे खरे रुप खांडेकर सांगतात. ययातिचे जीवनात बऱ्याच स्त्रिया आल्या पण भोगासक्त माणूस सतत अतृप्त असतो. हेच ययातिच्या रुपाने खांडेकरांना सांगायचे आहे. ययातिने त्याच्या जीवनात जे खरे प्रेम केले ते त्याला कधीच मिळले नाही. त्या प्रेमाचे केलेले वर्णन पुढीलप्रमाणे सांगता येईल.

ययातिने आपल्या संपुर्ण आयुष्यात खरे प्रेम एकदाच केले. तसे त्याचे प्रेम देवयानीवर, शर्मिष्ठेवर आणि मुकूलेकेवरही होते. पण अलकेवर त्याने केलेले प्रेम यापेक्षा भिन्न आहे ते अधिक पवित्र आणि शुद्ध आहे. आलकेने त्यांचे संपूर्ण जीवनच व्यापून टाकलेले आहे. तिच्या संबंधीचे प्रेम ययातिच्या आशय अभिरुचीतून व्यक्त केले आहे. अलका पुन्हा त्याला दिसलीच नाही. तिची भेट पुन्हा जी झ ाली ती हिमालयात. त्यावेळी तिचे दुसऱ्यांदा चुंबन घेण्याचा तो प्रयत्न करतो. तिच्याकडून विष .... विष...... इतकाच नकार मिळतो. ती नखशिखान्त थरथरते. तिला कंप सुटतो. 'स्वत:ची आठवण ठेवा' असे ती ययातिला म्हणते. ययाति तिला कुरवाळतो. तिच्या डोक्यात एक सोनेरी केस त्याला दिसतो. जी अलका त्याला सर्वस्वाने हवी असते ती जीवनभर मिळतच नाही. तिच्या आठवणीने ययातिचा तोल जातो आणि मग तो कुठल्याही परिस्थितीत सोनेरी केस असलेल्या मुलीची अपेक्षा करतो. मद्याच्या बेहोशीत, उपभोगाच्या अतिखोल दरीत त्याला सोनेरी मुलगी हवी आहे. जिच्या मिठीत तो सर्वस्व हरवू इच्छित होता, तिच्या आठवणीने तो जन्मभर व्याकुळ होत राहिलेला होता.

'ययाति' हा या कादंबरीचा खरा नायक आहे. राजा असूनही राजपद विसरुन स्त्रीभोगात कसा गुरफटुन जातो. यासंबंधी स्वतःही खांडेकरांनी मत मांडलेले आहे. "ययाति हा आष्टोप्रहर सुख भोगण्याच्या निराधार नादात आत्मलोपाल आनंदीचा दिवा मालवायला प्रवृत्त झालेल्या मानवाचा प्रतिनिधी आहे." वि.स. खांडेकरांनी पौराणिक विषयाच्या आणि आशय अनुभूतीच्या भूमिकेतून स्थान आधुनिक काळातदेखील मानवी जीवनात भोगवादी प्रवृत्ती कशी आहे याचे वास्तवपूर्ण विवेचन या कांदबरीतून व्यक्त केल्याचे दिसून येते.

- **आत्मकेंद्रित ययाति :**

वि. स. खांडेकरांच्या 'ययाति'मध्ये खुपच आत्मकेंद्रीतपणा आहे आणि कोणत्याही सुखवादी, भोगवादी माणसाची वा समाजाची ती मुलभूत प्रवृत्तीच आहे. पण यामुळे खांडेकरांच्या 'ययाति'ला पुरेशी सहानुभूती वाचक देवू शकत नाही. उलट त्यांच्या दुःखाचं,

एकटेपणाच्या भावनेचं, भयाचं अवलोकन थोडं तटस्थपणेच वाचक करतो. (मात्र खांडेकरांना हे अभिप्रेत नाही असं वाटतं) यचु शत्रूच्या कब्जात गेल्याचं कळतं तेव्हा ययातिची प्रतिक्रिया बधिरपणाची, निष्क्रीयतेची हृदयशुन्यत्वाची वाटते. देवयानीबद्दल त्याचा आकस ठीक आहे. पण यचूबद्दल त्याच्या संवेदनाहीनतेला काही काही समर्थनीय कारणभाव नाही. "खांडेकरांनी 'ययाति' यचूचे संबंध फार दुर्लक्षित केले आहेत. त्यामुळे तारुण्य मागणं आणि ते मिळत नाही म्हणून निराश होणं परिणामकारक वाटत नाही. अठरा वर्षात ययाति वाढलाच नाही. मंदारचा पुर्वतिहास ठाऊक असताना राजा ययाति सहजपणे पुर्णतः त्याच्या ताब्यात जातो. या राजाला कुठेही संशय येत नाही. अनुकूल प्रतिकुल विचारांचा कल्लोळ त्याच्या मनात उत्पन्न होत नाही. पण आश्चर्य याचे वाटते की, बाजूला देवयानीच्या उपेक्षेनं, अवहेलनेनं, दुष्टपणानं दुःखी झालेल्या ययातिला अलका, माधव, कच, शर्मिष्ठा यांच्या निरपेक्ष प्रेमाचा अनुभव अळवावरच्या पाण्यासारखा विशेष हलवून न सोडता वरुन निघून जातो. अशा तऱ्हेने ययातिचं व्यक्तिमत्व एकांगी, सामान्य वाटतं." थोडक्यात राजाश्रय, दासी यांच्यासोबत शरीरसुखात, उपभोगात खरा आनंद आणि खरे जीवनसुख मानणाऱ्या एका व्यक्तीमनाचे प्रतिनिधीक रुप म्हणजे 'ययाति' हा होय. हेच खांडेकरांना या कांदबरीतून 'ययाति' च्या रुपाने स्पष्ट केल्याचे दिसून येते.

- **कच :**

वि.स.खांडेकरांनी देव आणि दानव यांच्यातील जीवनसंघर्ष व्यक्त केले आहेत. पुराणकाळातील देव आणि दानव यांच्या भांडणातील पुराण प्रसिध्द एक व्यक्तीरेखा म्हणजे कच हा होय. या कादंबरीत 'ययाति' बरोबर कचाच्या मनोभावनेचे खांडेकरांनी जे दर्शन घडवले ते पुराणकथेला फाटा देवून कचाच्या जीवनाचे काही दर्शन कल्पनिकतेने लिहिल्याचे स्वतः खांडकरांनी सांगितले आहे. "या कादंबरीतील कच पहावा म्हणजे ही स्वतंत्र कादंबरी आहे. असे मी का म्हणतो ते लक्षात येईल. संजीवनी विद्येचे हरण करुन देवलोकी गेलेला महाभारतातील कच पुन्हा आपल्याला कधीच भेटत नाही, पण या कादंबरीत मी त्याचे उत्तरचरित्र अर्थात काल्पनिक - चित्रीत केले आहे. ययाति देवयांनी व शर्मिष्ठा यांच्याशी निरनिराळ्या नात्यांनी तो निगडीत झाला आहे. प्रेमाची जी विविध स्वरुपे या कादंबरीत चित्रीत झाली आहेत. त्यातल्या एका श्रेष्ट स्वरुपाचा तो प्रतिनिधी आहे. किंबहुना 'ययाति' हा जरी या कादंबरीचा नायक वाटत असला तरी ही कादंबरी जशी दोन नायिकांची आहे. तशीच ती दोन नायकांचीही आहे. कचाचे हे पुढले चरित्र रंगविण्याची कल्पना मला १९३० च्या आसपास सुचली. 'गडकरी - व्यक्ती आणि वाङ्मय' या पुस्तकातील उपसंहाराच्या प्रकरणात या कचाचा उल्लेख झाला आहे."

'कच' या व्यक्तीचे खांडेकरांनी ते रुप उभे केलेले आहे. त्यात संजीवनी विद्या घेवून कायमचा स्वर्गलोकात गेलेल्या संजीवनी विद्या प्राप्त केलेल्या देवलोकात गणल्या गेलेल्या महान व्यक्तींचे चित्र खांडेकरांनी उभे करतात. मृत्यू लोकांतील सामान्य माणसाच्या दृष्टीने कचाचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. शुक्राचार्यांची कन्या देवयानीवर त्याचे प्रेम असते. पण यात दुदैवाने तो सफल होवू शकत नाही. यामुळे तो निराश, हताश न होता प्रेमभंगाच्या वैफल्याच्या गाळात रुतून बसत नाही. देवयानीवर केलेल्या त्याच्या प्रेमात कोठेही कामवासना दिसून येत नाही. तर त्याच्या मनात निरपेक्ष प्रेम काठोकाठ भरलेले आहे. एकीकडे या कादंबरीतील 'ययाति' भोगासक्त प्रवृत्तीचा आहे. तर दुसरीकडे याच हा निरपेक्ष प्रेम करणारा प्रेमात अपयश आल्यामुळे दुःख न मानणारा संयमी आणि ध्येयवादी तरुण 'ययाति' तून खांडेकरांनी उभा केला आहे.

प्रेम ही भावना मुळातच कशी असते. याचे एकरुप 'कच' या व्यक्तीरेखेतून खांडेकरांना सांगावयाचे आहे. कचाचे जसे देवयानीवर प्रेम असते तसेच यती, ययाति, शर्मिष्ठा, राजमाता या सर्वाविषयी त्याच्या मनात एक निरपेक्ष प्रेम आहे. देवयानीवरच्या त्याच्या विफल प्रेमातून खऱ्या प्रेमाचे दर्शनच कचाच्या रुपाने घडविलेले आहे. 'ययाति' आणि 'कच' या व्यक्तीरेखेबद्दल स्वतः खांडेकर म्हणतात, "कच हा आत्मविकासाची घडपड करणाऱ्या मानवाचा प्रतिनिधी आहे. 'ययाति' हा आष्टौप्रहर सुख भोगण्याच्या निराधार नादात आत्मलोपासा-अंतरीचा दिवा मालवायला प्रवृत्त झालेल्या मानवाच्या प्रतिनिधी आहे." वि.स.खांडेकरांनी 'ययाति'तील व्यक्तीचित्रणांची मनोभूमिका वर्गिकरणाच्या भूमिकेतून स्पष्ट केल्याचे दिसून येते. मनातून पुराणकाळातील कच जसाच्या तसा उभा करण्याची मानसिकता नव्हती, तर एकीकडे ययातिचा भोगवाद हा या कादंबरीतून मांडताना, दुसरीकडे कच या व्यक्तीचित्रणातून निरपेक्ष प्रेम करणाऱ्या खऱ्या मनोवृत्तीचे दर्शन घडविण्यासाठीचे कचाचे चित्रण ययातित केल्याचे स्पष्ट होते.

- **देवयानी :**

ऋषीकन्या देवयानी ही ययातिची नुसतीच पत्नी नव्हती तर याहीपेक्षा अजून काही अधिक होती. आपल्या सौंदर्याचा तिला विलक्षण अभिमान होता. तिच्या व्यक्तीमत्वात एक प्रकारचा गर्व होता. आपल्या रुपाच्या तालावर आपण पुरुषाला शरण आणू शकतो. या अहंकाराच्या धुंदीने देवयानी झपाटलेली होती. ती लावण्यवती होती, सौंदर्यपूजक होती, श्रृंगारसाधनेत कुशल होती, पण तिच्या व्यक्तीमत्वाचे अंहतेचे एक केंद्र होते. त्यामुळे ययातिच्या नशिबी अपयशाशिवाय दुसरे काहीच आले नाही. ययातिच्या दृष्टीने देवयानी

एक अप्सरा होती. जी शृंगारलेल्या महालात स्वत:भोवती गिरक्या घेत फिरत होती. प्रत्येक आरशात पडलेल्या आपल्या मोहक प्रतिबिंबाचे निरीक्षण करुन संतुष्ट होणार होती. देवयानीजवळ जे काही होतं ते सारे ययातिसाठी नसून केवळ तिच्यासाठीच होते. 'एकदा ऐन मध्यरात्री, आपल्या बाहूंच्या विळख्यात असलेल्या देवयानीला 'तू कुणाची?' असा एक वेडा प्रश्न ययातिने विचारला. देवयानी म्हणाली, 'मी बाबांची, तुमची, मुलांची, आज महाराणी, उद्या राजमाता, मी कुणाची नक्की कसे सांगता येईल? अनेकांचा अधिकार असतो आपल्यावर. आपण अशी बाकींच्या बायकांसारखी रडत बसणार नाही. मी चार-चौघींपेक्षा निराळी आहे. मी असामान्य आहे. देवाने मला रुप दिले आहे. बाबांनी मला बुद्धी दिली आहे. जगाला भीक न घालण्याऱ्या व त्याला कस्पटासमान लेखणाऱ्या जगद्वंध शुक्राचार्यांची कन्या आहे मी. हे देवयानीने सांगितलेले तत्वज्ञान अशा परिस्थितीत ययातिने प्रश्न विचारला होता. त्या परिस्थितीशी गैरलागू होते. पण गुरुवर्य शुक्राचार्यांच्या तपस्येची प्रतिष्ठा जिच्या नसानसांतून वाहते आहे त्या देवयानीला ययातिच्या वेड्या प्रश्नाची काय मातब्बरी. देवयानी ही प्रथम आहे. बापाची अर्हंता देवयानीला केवळ पत्नी होऊ देण्यास तयार नव्हती. देवयानी उन्मादक होती. तिचे उन्मादक लावण्य ययातिच्या बाहुपाश्यात विझून गेल्यासारखे थंड पडत असे. आणि मग अतृप्त वासनांची आग त्याच्या उरात धगधगून उठत असे. देवयानीच्या व तिच्या पित्याच्या गरजांचे आपण एक साधन झालो आहोत. देवयानीच्या व तिच्या पित्याच्या नजरेत आपण तुच्छ आहोत ही काळीज कुरतडून टाकण्याची वेदना 'ययाति' भोगत राहिला.

आपण अश्वमेघकर्त्या सम्राटाची पत्नी आहोत हे देवयानीला कधी जाणवलेच नाही. म्हणून तिच्या नजरेत ययाति कस्पटासमान होता. तो तिचा नवरा होताही आणि नव्हताही. देवयानीचा जन्म केवळ ययातिला पोखरण्यासाठी आणि घडण्यासाठीच झ ाला होता. उलट ययातिसारख्या सम्राटाला देवयानीसारखी रुपसंपन्न आणि बुद्धीमान तर नव्हताच. उलट ययातिसारख्या सम्राटाला देवयानीसारखी रुपसंपन्न आणि बुद्धीमान पत्नी लाभली याचाच त्याला अभिमान अधिक होता.

- **शर्मिष्ठा :**

वि.स.खांडेकरांनी 'ययाति' या कांदबरीतील शर्मिष्ठेच्या व्यक्तिरेखातून तिची जीवनपद्धती, स्त्रीमनाचा कोंडमारा, तिच्या मनातील विविध भाव-भावना वास्तवपणे व्यक्त केल्याचे दिसून येते. ययातिने शमिष्ठेवर प्रेम केले पण ययातिच्या शमिष्ठेवरील प्रेमात उत्कठता मात्र फारशी जाणवत नाही. शरीरदान आत्यंतिक इच्छेतून दिले जात आहे. म्हणून त्याचे त्याचा स्वीकार केला इतकेच काय ते. देवयानीच्या मत्सरी आणि दृष्ट स्वभावाने दासी बनने भाग पडलेल्या शर्मिष्ठेच्या संबंधाने ययातिला प्रेमापेक्षा कीव अधिक वाटत होती. पण शर्मिष्ठेने केलेल्या आवाहनाचा स्वीकार करताना भितीग्रस्तता मात्र त्याला सोडीत नाही. शर्मिष्ठेच्या प्रेमाने 'ययाति' पुलकित झाला, बांधला गेला पण तिच्या प्रेमात 'ययाति' स्वत:ला हरवू मात्र शकला नाही. शमिष्ठेला त्याने मरणापासून सोडविले, पण त्यात प्रेमिकाची कृती न दिसता त्याचा भित्रेपणाचेच दर्शन अधिक घडते. मधुमीलनाच्या गोड धुंदीत झपाटलेला 'ययाति' जसा देवयानीच्या महालात प्रवेश करताना दिसतो तसा तो शर्मिष्ठेबरोबर दिसत नाही. देवयानीसाठी जसा तो अतृप्त शरीराने व भुकेल्या अश संतप्त मनाच्य कात्रीत रात्रभर तळमळत विव्हळताना दिसतो तशी उत्सुकता शर्मिष्ठेच्या वाट्याला आलेली दिसत नाही. ययातिला देवयानी हवी होती. तिच्या प्रेमात धुंदीत तो स्वत:ला विसरु इच्छीत होता. आणि देवयानी तर अशी सर्वस्वाने त्याला लाभणे शक्यच नव्हते. जे त्याच्या हक्काचे होते तेचं त्याला मिळत नव्हते. ययातिचे हे दु:ख होते.

- **अलका :**

'अलका' ही ययाति या व्यक्तीच्या संदर्भाने येणारी आणखी एक स्त्री व्यक्तीरेखा आहे. वि.स. खांडेकरांनी त्यांच्या कादंबरीतून जी पात्ररचना केली आहेत ती हेतुपुर्वक आहे. यातूनच ययातिच्या जीवनावरील विरोधाभास वाटवा असे एक स्त्री व्यक्तीचित्र म्हणजे ययातिची मानलेली बहीण अलका होय. 'ययाति' हा या कांदबरीचा प्रमुख नायक आहे. त्यांचे आणि अलकाचे जिवनचित्र मांडताना खांडेकरांनी खरे पाहिले तर 'ययाति' या कादंबरीतील व्यक्तीचित्रणाच्या संदर्भात खुप मोठा अन्याय केलेला आहे. ययातिची मानलेली बहीण म्हणून अलकाच्या या कथानकातील प्रवेशात वर्णन करताना खांडेकर म्हणतात, "मी फार मोठी आहे, फार-फार मोठी आहे, मी कोण आहे, हे आहे का ठाऊक?'

'नाही बुवा'
'हस्तिनापुरच्या ययाति महाराजांची बहिण.'

त्या रात्री शय्येवर मी पडलो, तेव्हा सोनेरी केसांची अलका नदीच्या शुभ्र निर्मळ प्रवाहात उभी राहुन म्हणत होती."[१५] ययाति हा भोगलोलुप मनोवृत्तीचा असला तरी त्याच्या जीवनात आलेल्या कोणत्याही स्त्रीबद्दलची त्याची भावना एका कामांध व्यक्तीमनाच्या भावनांचे दर्शन घडविताना मानलेली बहीण अलका यासंबंधी खांडेकरांनी 'ययाति' च्या जीवनात आलेल्या एका अलकाचे दर्शन घडवलेले आहे.

अलका ही एका दासीची मुलगी दासीकन्या म्हणून ययातिच्या दृष्टीने ती एक बहीण होती. पण ययाति आणि अलकाच्या मनात एकमेकांना पाहिल्यानंतरचे भाव बदलून जातात पण दासीकन्या म्हणून राजपुत्राच्या पाहण्याचा दृष्टीकोण 'ययाति' मधील पुढील उताऱ्यातून स्पष्ट होतो. ययातिला अलकेची आठवण होते. तशा त्याच्या दरबारातात बऱ्याच दाशी असतात पण ययातिला अलकेची आठवण होते. 'अलका एकदाही माझ्या पुढे आली नाही, मला कुठे विसरली नाही.' या ययातिच्या बोलण्यातून खांडेकरांनी अलका या व्यक्तीरेखेचे जीवन सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. रात्री भोजनाच्या वेळी मी आईला विचारले, 'अलका कुठं दिसत नाही?' माझा प्रश्न जणू काही आपण ऐकलाच नाही, अशा मुद्रेने आई म्हणाली, 'ययु, तू हस्तीनापूरचा राजा झाला आहेस आता. राजांनी राजकन्याकडे लक्ष द्यायचं असतं, दासीकडं नाही?' आई हे शब्द अत्यंत निर्विकार स्वराने बोलली. ती माझी थट्टा करीत आहे, की मला टोचून बोलत आहे, हेच मला कळेना. मी गप्प बसलो, पण तिच्या या शब्दामुळे पानातल्या सुरस पदार्थात मला गोडी वाटेना. ते तसेच टाकून मी उठलो. आईने खूण करुन मला आपल्या महालात बोलाविले. मी मुकाट्याने तिच्यामागून गेलो. लगेच तिने दार लावून घेतले. मग तिच्या मंचकापाशी असलेल्या एका वाघिणीच्या सुंदर पुतळ्याकडे पाहत ती म्हणाली, 'अलका आपल्या आयुष्याचे शेवटचे क्षण मोजत आहे.'
मी जागा आहे की एखादे स्वप्न पाहत आहे हे मला कळेना. मोठ्या कष्टाने माझ्या तोंडातुन उद्‌गार निघाला, 'म्हणजे?'

'या जगात जन्माला येण्याचा मार्ग एकच आहे. तसं मरणाचं नाही. मृत्यू अनेक वाटांनी येतो तो'

'पण तिची स्थिती तू मला सांगायचीस की नाही? मी राज वैद्यांना इथं राजवैद्यांच काही काम नाही. हा राजघराण्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे"[१६] खांडेकरांनी भगिनीचे रुप देणाऱ्या ययातिबरोबरच अलकेला बहिण मानणाऱ्या कचाचे आणि ययातिचे खरे रुप प्रकट करताना दासीकन्या असलेल्या अलकेचे खरे रुप प्रकट करताना गुडघ्यात मान घालून बसलेल्या अलकेसंबंधीचे पुढील एक संवादातून खरे रुप प्रकट केले आहे. तिच्या सोनेरी केसांनी भुरळ पडल्यमुळे ययाति आणि अलका यांच्या संबंधाचे खरे रुप प्रकट होते ते पुढील उदाहरणातुन स्पष्टपणाने जाणवते. ती माझ्याकडे नुसती पाहत राहिली. तिचा चेहरा काळाठिक्कर पडला होता. डोळे तारवटून गेले होते. पुन्हा पुन्हा माझ्याकडे पाहत ती म्हणाली, 'कोण आहे?' तिला ऐकू येत नव्हते, दिसत नव्हते. माझ्या काळजात चर्रर झाले. तिचे दोन्ही खांदे गदागदा हालवित मी चित्कारलो, 'अलके!'

तिने माझा आवाज ओळखला. तिच्या ओठांना मंद स्मित स्पर्श करुन गेले. तिच्या जड पण गोड आवाजाने विचारले, 'कोण? महाराज? ' तिच्याजवळ बसुन मी तिचे मस्तक लहान मुलासारखे खांद्यावर घेतले. ते थोपटीत उद्‌गारलो, 'काय हे अलके?' तिच्या पलीकडेच एक रिकामा पेला पडला होता. त्याच्याकडे मोठ्या कष्टाने बोट दाखवित ती म्हणाली, 'त्याला विचारा. त्या-त्या पेल्यात प्रेम होते ते ते मी प्याले!' तिला पुढे बोलावेना. एकदम तिच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले.

माझा खांदा भिजुन चिंब झाला. मध्येच जीवांच्या आकांताने ती म्हणाली, 'तो - तो मंदार त्यांने त्याने त्याला मी-'

तिची जीभ अडखळू लागली. मी वेड्यासारखा तिला थोपटीत होतो. तिच्या अंगावरुन हात फिरवित होतो. ती आळोखेपाळोखे देवू लागली. तिला त्या विषाच्या विलक्षण वेदना होत असाव्यात. तिचे अंग गार पाडत चालले होते. माझ्या खांद्यावरले तिचे मस्तक जडजड होवू लागले. तिला नीट श्वास घेता येईना. काय करावे हे तिला कळेना. तिला आचके येवू लागले. मध्येच खोल गेलेल्या स्वराने ती म्हणाली, म-म-मला विसरु नका, म-माझा एक सोनेरी केस-आठवण -अग, बाई गं...... ' तिचा एक सोनेरी केस मी हळूच तोडला. ती आता केवळ काही क्षणांची सोबतीण होती. माझ्यापाशी तिला मरण आले होते. मृत्यूच्या अज्ञान प्रदेशातला कधीही न संपणारा प्रवास करायला अलका-माझी-माझी दुर्दैवी अलका निघाली होती. त्या प्रवासात तिला अखंड धीर येईल अशी एखादी खुणेची वस्तू बरोबर द्यायला नको का?" मृत्यूच्या दारात राजासुद्धा भिकारी होतो. मी तिला काही-काही देवू शकत नव्हतो. या ययातिच्या उद्‌गारातून त्यांचे अलकेवर केलेले प्रेम हे पवित्र आणि शुद्ध आहे, याचीच पूर्ण जाणीव ययातिच्या मनातील खऱ्या भावनेतून कळून येते. देव आणि त्याची पत्नी श्रमिष्ठेवर त्याचे प्रेम या भोगवादी ययातिचे जे त्याच्या जीवनात निरपेक्ष प्रेम केले ते अलकेवर तिच्या प्रेमासंबंधी ययातिची जी मनोअवस्था प्रकट झाली आहे त्या मानसिक बंधाचे अलकेवरील खऱ्या प्रेमाने ययातिच्या मनातील भाय्यात्म भाव पुढील उदाहरणावरून खांडेकरांनी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ययातिने आपल्या संपुर्ण आयुष्यात खरे प्रेम एकदाच केले. तसे तर त्याचे प्रेम देवयानीवर, शर्मिष्ठेवर आणि मुकूलिकेवरही होते पण अलकेवर त्याने केलेले प्रेम यापेक्षा भिन्न आहे. ते अधिक पवित्र आणि शुद्ध आहे. अलकेने त्याचे संपुर्ण जीवनच व्यापून टाकलेले आहे तिच्या संबंधीचे प्रेम ययातिच्या गात्रा-गात्रातून सळसळत आहे. अलकेवर प्रेम, यापेक्षा भिन्न आहे. ते आपण पाप तर करत नाही ना? अशी शंका उगीचच त्याचा पिच्छा पुरवित आहे. ह्या अलकेवरील त्याच्या प्रेमाला कजरेपणाने, बालीश धिटाईने आणि दीर्घ चर्वणाने अपार माधुर्य आलेले आहे. पण ही अलका पुन्हा त्याला दिसलीच नाही. तिची भेट पुन्ही जी झाली ती हिमालयात. त्यावेळी तिचे दुसऱ्यांदा चुंबन घेण्याचा तो प्रयत्न करतो. तिच्याकडून 'विष............ विष' इतकाच नकार मिळतो. ती नखशिखान्त थरथरते. तिला कंप सुटतो. 'स्वतःची आठवण ठेवा." असे ती ययातिला म्हणते. ययाति तिला कुर्वाळतो. तिच्या डोळ्यांत एक सोनेरी केस त्याला दिसतो. जी अलका, त्याला सर्वस्वाने हवी असते ती जीवनभर मिळतच नाही. तिच्या आठवणीने ययातिचा तोल जातो आणि मग तो कोणत्याही परिस्थितीत सोनेरी केस असलेल्या मुलीची अपेक्षा करतो. मधाच्या बेहाशीत उपभोगाच्या अतिखोल दरीत त्याला सोनेरी केसांची मुलगी हवी आहे. जिच्या मिठीत तो सर्वस्व हरवू इच्छित होता. जिच्या आठवणीने तो जन्मभर व्याकुळ होत राहिलेला होता. जिच्या प्रेमाच्या दाहकतेत जन्मभर तो जळत राहिला तिला खून प्रत्यक्ष आपल्या करुन पाडला गेला हे त्याला कळते आणि मग ययातिचा तोल सुटतो. एका लहानशा सुकुमार आयुष्याला एवढ्या जळवा लागलेल्या असू शकतात या दाहक अुभवाने ययाति ज्वालामुखीसारखा पेटून निघाला. महत्वकांशी आणि खुनी असलेल्या आईचा सुड घेण्यासाठी त्याने देवयानीबरोबर लग्न केले. 'ययाति' या कादंबरीतील अलका ही ययातिच्या जीवनात आलेली त्याने तिच्यावर आतल्या मनातून प्रेम केलेले एक स्त्रीपात्र आहे. खांडेकरांचा ययाति लेखनाचा संदर्भ लक्षात घेताना आणि कथानकाच्या जडणघडणीत ययातिसोबत अलकाचे व्यक्तीचित्र रेखाटताना अत्यंत विसंगती आढळून येते. खांडेकरांची व्यक्तीचित्रणाची आणि मानसिक चित्रणाची अवस्था ही ययातिमधून पुर्णपणाने विस्कळीत झालेली आहे. आधी बहीण म्हणुन स्विकारलेल्याअलकेची चुंबन घेणारा ययाति, त्याच्य मनातील चाललेल्या कामवासनेच्या भावनांचे चित्रण यातुन अलकाकडे पाहण्याचा ययातिचा दृष्टीकोन चित्रीत केल्याचे दिसून येते.

### ५. 'ययाति' कांदबरीतील घटना प्रसंग :

लेखक अनुभव, घटना आणि प्रसंग यांच्या रुपानेच कलाकृतीला परिपुर्ण बनवित असतो. कांदबरीच्या रचनेत अनेक घटना-प्रसंगांची उभारणी केलेली असते. घटना प्रसंगाना कादंबरीत महत्वाचे स्थान असल्याचे सांगता येते. एखादी घटना कांदबरीला कलाटणी देऊन जाते आणि संपुर्ण कांदबरीचे पुढील कथानक घडत जाते. वि.स.खांडेकर 'ययाति' कांदबरीतून अशा अनेकविध घटनाप्रसंगांची उभारणी करुन कांदबरीच्या कथानकाला गती दिलेली आहे. 'ययाति' कांदबरीतून साकारलेले घटना व प्रसंग पुढील प्रमाणे.

ययातिच्या जीवनातला सर्वात कळसाचा प्रसंग म्हणजे-देवयानीने त्याला आपल्याला स्पर्शही न करण्याविषयी घ्यायला लावलेली शपथ, हा प्रसंग खांडेकरांनी खूपच चार्तुर्याने रंगवला आहे. एकीकडे पुरु व शर्मिष्ठा यांना जीवनातून उठवण्याचा घाट घालणारी देवयानी कलावंत म्हणून अतिशय उन्मादक नृत्य करते. कमालीचा उत्तेजक अभिनय करते. हा तिचा अभिनयाचा उन्मादक, उत्तेजकपणा ययातिचे हृदय अधिकपणाने रिते करतो. देवयानी एकांत परमसुखाच्या वेळी दुसऱ्याचा विचार करते याची बोचक जाणीव ययातिला व्यथित करुन जाते."[११] ययातिच्या जीवनातील शेवटच्या या प्रसंगाने त्याचे मन पूर्णपणाने व्यथित होते. त्यातच शर्मिष्ठेच्या विरहाची व्यथा यामुळे ययाति मद्य घेतो. त्याची मनोवस्था पूर्णपणाने बिघडून जाते, भकास, उदास मनातून विक्षिप्तपणा येतो. तो देवयनीने केलेली ययातिचा त्याग आणि शर्मिष्ठेच्या विरह, अलकाचे, मृत्यू ह्या साऱ्या घटना-प्रसंगाने त्याची मानसिक स्थिती कशी बिघडत जाते. हेच या प्रसंगातील गांभिर्य खांडेकरांना सांगावयाचे आहे.

या कादंबरीतील जे घटना, प्रसंग घडतात ते राजकीय, सामाजिक, धार्मिक स्वरुपाचे नसून ययाति, देवयानी, अलका, शर्मिष्ठा, कच या व्यक्तिचित्रणाच्या अंगानेच म्हणून व्यक्तीप्रधान घटना-प्रसंग या कांदबरीत आलेले आहेत. त्यात खांडेकरांच्या योगायोगावर अधिक भर असल्याचे स्पष्टपणे जाणवते. वि.स.खांडेकरांनी व्यक्ती मनाचा वेध घेणाऱ्या घटना प्रसंगाचे नीट प्रसंगावधान त्यांनी सांभाळले आहे. कथानकास अनुरुप घटना-प्रसंग आलेले आहेत. पण; या वर्णनात उत्कटता साधता आली असती; खांडेकरांनी प्रसंगचित्रणात पुन्हा अतिरेकी अलंकारिक भाषेचे योजना केल्यामुळे प्रसंगातील मर्म आणि वर्णनातील उत्कटता या गोष्टी खांडेकर सांभाळू शकले नाहीत. 'ययाति' ही एका व्यक्तीमनाची भोगवादी कथा आहे. म्हणून या कादंबरीत नाजुक भावनिक प्रसंग पहायला मिळतात. ययाति, अलका, देवयानी, शर्मिष्ठा यांच्यातील भावनिक पातळीवरचे प्रसंग वर्णन केलेले आहेत.

'ययाति' हा नहुष राजाचा मुलगा महाराज बरेच वर्ष अंथरुणाला खिळून बसले होते. तो प्रसंग ययातिच्या तोंडून व्यक्त केला आहे. "क्वचित बाबांच्या वाताचा जोर कमी होई. घटका, आर्धी घटका ते शुद्धीवर येत. आईला ओळखीत. असाच प्रसंग होता तो! मी उशाशी येऊन बसलो आहे, याची बाबांना कल्पना नसावी त्यांनी आईला खुण केली. ती थोडी पुढे होऊन वाकली मोठ्या कष्टाने त्यांनी आपला उजवा हात उचलला आणि तो तिच्या हनुवटीला लावला. क्षीण स्वरात ते म्हणाले , "हे सारे सौंदर्य, हे सारं वैभव इथंच टाकून

जावं लागणार मला."[२०] नहुष राजाचा अंत जवळ आला होता मृत्यूच्या शय्येवर ते शेवटच्या घटका मोजत होते. या प्रसंगातून खांडेकरांनी नहुषाच्या मृत्यूची सूचना देऊन ययाति राजपदावर येणार हेच सूचित केले आहे. अलकेच्या मृत्यूचा प्रसंग वर्णन केलेला आहे. नहुषाची आई तिला विष पाजते आणि अलकाची कशी अवस्था होते.

"मग खोलीच्या मध्यभागी गुडघ्यात मान घालून बसलेली अलका दिसली. जड पावलांनी मी तिच्या जवळ गेलो. तिला माझी चाहूल ऐकू आली असावी. मी अगदी जवळ जाऊन तिच्या खांद्यावर हात ठेवला, तेव्हा कुठे तिने हळूहळू आपली मान वर केली, ती माझ्याकडे नुसती पहात राहिली. तिचा चेहरा काळा ठिक्कर पडला होता. डोळे तारवटून गेले होते."[२१] वि.स. खांडेकरांनी अलकाची झालेली शोकांतिका अत्यंत करुण्यतेने या कांदबरीत चित्रीत केलेली आहे. निर्दयपणाने अलकेला विष पाजवले. विषाच्या वेदना सहन करत ती मृत्यूची शेवटची घटका मोजत होती. तिथे ययाति जातो. तिला वाचवण्याऐवजी शुद्धीवर नसलेल्या अलकेच्या नाजुक ओठांवर चुंबनाचा वर्षाव करतो. ती मरते आहे आणि ययाति भोगदृष्टीतून तिच्यावर तुटून हा प्रसंग अलकेचा मृत्यू दाखविला नसून ययातिच्या प्रेमाचा, भोगाचे वर्णन केले आहे. प्रसंग चित्रणात विपर्यास झाला आहे. कुठेही हा प्रसंग उत्कट, करुण वाटत नाही. अलंकारिक भाषेने त्यातले पुन्हा गांभिर्यच संपवून टाकले आहे.

### ६. **'ययाति' कांदबरीमधील संवाद :**

कादंबरीच्या घटकांतील अतिशय महत्वाचा आणि कांदबरीच्या आशय-विषयाला साकारणारा प्रधान घटक म्हणून संवादाला महत्व आहे. कथेची रंगत वाढविणे, कथानकाचा विकास करणे व स्वभावदर्शन घडविणे इ. कार्य संवादाची असलेली दिसुन येतात. कांदबरीतून येणारे 'संवाद' निवेदनवर्णन आहे. कांदबरीतील पात्राला सजीव करण्याचे व कथेच्या वातारणात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य संवादामूळे शक्य होते. तसेच विनोदाचा एक प्रकार म्हणून ही कादंबरीत संवादाची योजना होताना दिसते. पात्रांचा स्वभाव त्यांची मन:स्थिती, संस्कृती, आचार - विचार , भाव-भावना, बोलण्याच्या पद्धती इ. दर्शन संवादामूळे घडते. वि. स. खांडेकरांच्या 'ययाति' या कांदबरीतही असे विविधांगी संवादातून स्पष्ट झाल्याचे दिसून येते.

'ययाति'मध्ये खांडेकरांनी त्या त्या पात्रांच्या तोंडून निवेदन केलेले आहे. त्यामुळे संवादाची बरीचशी जागा आत्मनिवेदनामूळे पुसट झालेली आहे. 'संवाद' हा कादंबरीचा एक महत्वाचा घटक आहे. संवादातून व्यक्तीच्या मनातील भाव-भावना, कृती-उक्ती लेखक दाखवून देत असतो. व्यक्ती मनातील कोणतेही भाव प्रकट करण्याचा एक मार्ग संवादाच्या रुपाने कांदबरीकार साधत असतो. संवाद हा नाटक, कादंबरीचा एक महत्वाचा भाग आहे. 'ययाति' कादंबरीत मोजकेच संवाद आलेले आहेत. यादृष्टीने काही संवादाची उदाहरणे पाहता येतील. ययाति, त्याची आई राजमाता इंद्राणी, शर्मिष्ठा, कच, देवयानी, अलका, यांच्यांत मोजकेच संवाद खांडेकरांनी वर्णन केलेले आहेत. ययाति व त्याच्या आईचा पुढील संवाद लक्षात घ्यावा लागतो. 'ययु, तू खुप मोठा झाल्यावर हे सांगणार होते मी तुला. पण आज तू माझ्यावर रुसलास, उद्या रागावशील, परवा डोक्यात राख घालून जाशील, तो गेला तसा म्हणून "देव जाणे! जिथे असेल तिथं देवानं सुखी ठेवावं, एवढीच प्रत्येक मी प्रार्थना करते." हा कादंबरीच्या प्रारंभीच काही निवेदनानंतर खांडेकरांनी संवाद योजिलेला आहे. हा मातृवात्सल सांगणाऱ्या, ययातिच्या आईचे, इंद्राणीचे मनोदर्शन घडविणारा काही तर ययाति त्याच्या जीवनात वय वाढल्यावर आपोआप कसा राजा होणार याच्या सूचना वरील संवादातून केलेली आहे. ययातिला मोठा भाऊ असतो. त्यासंबधी त्याला कसलीच माहिती नसते. त्याच्या आईकडून त्याला कळते पण तो घरातून कायमचा निघुन गेलेला असतो.त्यामुळे 'ययाति' वर पुढे राज्य चालवण्याचा आपोआप अधिकार येणार याचीच योगायोगातून जाणीव खांडेकरांना या माता-पुत्रांच्या संवादातून करुन द्यायची आहे. हेच स्पष्ट होते.

ययाति आणि देवयानी यांच्या संवादातून एका ब्राम्हणकन्येचे पाणिग्रहण केल्यानंतर देवयानीच्या मनातील भाव सांगणारा एक संवाद खांडेकरांनी सहज वर्णनातून सांगितला आहे. ययाति हा योगायोगाने राजा होतो. कारण त्याचा मोठा भाऊ संन्याशी म्हणून कायमचा राजवाड्यातून निघून जातो. घराचा वंशाचा दिवा उरतो तो ययाति. आणि योगायोगाने दानवाच्या शापाच्या भीतीने तो ब्राह्मणकन्या देवयानीचे अविवेकीपणाने पाणीग्रहण करतो. या ठिकाणी वैवाहिक जीवनाचे धार्मिकतेच्या अंगाने विचार केलेला आहे. यादृष्टीने ययाति व देवयानी यांचा संवाद महत्वाचा आहे. तो या कादंबरीत कसा आलेला आहे याचे पुढील एक उदाहरण पाहता येईल. देवयानीचा उजवा हात ययाति सोडवू लागते. तेव्हा खांडेकरांनी दोघांच्या प्रेमिक पती-पत्नीच्या जीवनाच्या एकरुपतेचे दर्शन घडविणारा पुढील संवाद या कादंबरीत योजिलेला आहे. देवयानी म्हणते,'असा नाही सोडता येणार माझा हात! आपण पाणिग्रहण केलंय माझं!' ते चपापून म्हणाले, 'हे कसं शक्य आहे? तू ब्राम्हणकन्या, मी क्षत्रिय राजकुमार, असला विवाह"असले अनेक विवाह पूर्वी झालेले आहेत महाराज, लोपामुद्रेच उदाहरण" छे ! मी हसून म्हटले, 'महाराज, मी आपली राणी व्हावं, अशी दैवाचीच इच्छा आहे, नाहीतर आज या अरण्यात आपलं येणं कशाला झालं असतं? आपण नेमके याच विहीरीजवळ कसे आला असता? पुर्वजन्मीच्या ऋणानुबांधातून का अशा गोष्टी घडून येतातं" खांडेकरांचे संवाद कौशल्य हा फार मोठा अभ्यासाचा या कादंबरी संदर्भातला विशेष नाही तर, भाषिक, काव्यात्म कसोट्या या त्यांच्या निवेदनाचा विशेष आहे. देवयानी-ययाति यांच्यातील संवादातून ब्राम्हण आणि क्षत्रिय नाते जुळले ते एक योगायोग

होय. शुक्राचार्य या ब्राह्मणाची कन्या, क्षत्रिय राजा ययातिबरोबर विवाह करते. या पाठीमागची कारणमिमांसाच खांडेकर सांगतात. पुर्वजन्मीचे ऋणानुबंध, पुर्वजन्मीच्या गाठी हा भाग पौराणिक आहे पण, देवयानी ययाति यांच्या मनोदर्शनाचे मर्म उलगडून दाखविण्यात खांडकेरांना खरा रस दिसत नाही. म्हणून संवादातून व्यक्तीच्या मनोधर्माचे दर्शन घडविण्याकडे त्यांचे मुळीच लक्ष नसल्याची जाणीव होते.त्यामुळेच त्यांनी कादंबरीच्या कथन-कौशल्यात शक्यतो संवाद टाळल्याचेच पहायला मिळते. खांडेकरांनी ययातिच्या जीवनाची कहाणी, त्यांच्याच तोंडून कथन करण्याकरिता संवाद या घटकाकडे बरेचसे दुर्लक्ष केल्याची जाणीव होते.

अशा प्रकारे वि. स. खांडेकरांच्या 'ययाति' कादंबरीची विविधांग सामोरे आणता येतात. खांडेकरांनी आपल्या प्रतिभाशक्तीने साकारलेला पौराणिक जीवन विषय अतिशय परिणामकारकतेने चित्रीत केला आहे. कांदबरीतून साकारणाऱ्या व्यक्तिरेखांच्या स्वभाववृत्तीचे दर्शन समकालीन समाजजीवनातही घडताना दिसते. म्हणूनच पौराणिक जीवनविषयाला खांडेकरांनी साकारले असले तरी, त्यांचा व्यापक दृष्टीकोन, वर्तमान समाज जीवनाशी धागे जोडताना दिसून येतो. कादंबरीची हीच खरी यशस्वीता तिच्या कलात्मक गुणाला साकार करते आणि म्हणूनच तिला 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार मिळणे क्रमप्राप्त वाटते.

**निष्कर्ष**

साहित्य अकादमीने पुरस्कार देऊन गौरविलेल्या कालाकृतींचे वर्गीकरणाच्या अनुषंगाने विचार केला आहे. अकादमीने १९५५ पासून ते आजतागायत संशोधन कथा, कविता, चरित्र, आत्मचरित्र, नाटक, ललित अशा वेगवेगळया प्रकारातील कलाकृतींची परुस्कारासाठी निवड केलेली आहे. या कलाकृतीतून पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, ग्रामीण, दलित व्यक्तिचित्रणात्मक अशा वेगवेगळया जीवनांगाचे वैविध्यपूर्ण दर्शन घडते. अशा वेगवेगळया प्रवाह प्रकारात आणि चित्रणात विभागल्या गेलेल्या या कलाकृतीचे वर्गीकरणाच्या अनुषंगाने विवेचन करुन या वर्गीकरणातील वैविध्यामुळे त्या पुरस्कारास कशा सिध्द झाल्या आहेत ते लक्षात येते शिवाय या वर्गीकरणाच्या अनुषंगाने सखोल विचार करताना जशा गुणात्मक बाजू ध्यानात येतात.

पौराणिक जीवन चित्रणाला साकारणारी 'ययाति' ही खांडेकरांची श्रेष्ठ कलाकृतीही आहे. मान्यच करावे लागते. परंतू 'ययाति' आत्मकेंद्रपणा या कादंबरीच्या गुणात्मकतेत दोषाचे प्रतिबिंब बनून सामोरा येतो. तरीही समकालीनात 'ययाति' च्या श्रेष्ठत्व मान्य करावे लागते आणि म्हणूनच ती पुरस्कारास पात्र ठरते.

**संदर्भ**

१) खांडेकर वि.स., 'ययाति', मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे, मलपृष्ठ
२) खांडेकर वि.स., उ.नि.पृ.४.
३) खांडेकर वि.स., उ.नि.दोन शब्द.
४) खांडेकर वि.स., गडकरी - व्यक्ती आणि वाङ्मय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,पृ.४०६.
५) खांडेकर वि.स., उ.नि.२०८.
६) खांडेकर वि.स., उ.नि.पृ.६०.